**दिनांक 20 / 4 / 2026**

**विषय. कॉर्पोरेशन कडून मंजूर झालेल्या इमारती चा प्लॅन आणि मिळणाऱ्या पार्किंग ची माहिती देण्या करिता झालेला मेळावा.**

दिनांक 19/4/26 ला वरील विषयांवर सभासदांना माहिती देण्या करिता आणि पार्किंग या विषयावर सभासदांचे ची मतं जाणून घेण्या करिता संस्थे च्या सभागृहात एक मेळावा घेण्यात आला. मेळाव्याला 81 सभासद उपस्थित होते.

संस्थे चे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मेळाव्याच्या प्रयोजना बद्दल माहिती दिली.

आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पात आपले सल्लागार श्री हर्षद कवडीकर यांनी, आपल्या प्रकल्पा चा जो बेसिक प्लॅन कॉर्पोरेशन ने मंजूर केला आहे, त्या बद्दल PPT presentation च्या मदतीने सगळी माहिती दिली. बेसिक प्लॅन ला मंजुरी म्हणजे सध्या आपल्या सोसायटी कडे जितकी जागा आहे आणि नियमांप्रमाणे त्या जागे वर जितके बांधकाम होऊ शकते त्याला मिळालेली मंजुरी. ह्यात प्रकल्पात प्रायोजित टॉवर 1, सगळ्या डुप्लेक्स युनिट्स आणि समाज मंदिरा सकट सगळा commercial भाग येतो. त्यांनी असे ही स्पष्ट केले कि टॉवर 2 सकट आपल्या पूर्ण प्लॅन ला ही कमिन्समेंट सर्टिफिकेट सह मंजुरी मिळाली आहे पण त्याच्या ड्रॉइंग ला approval टीडीआर लोड झाल्यावर मिळेल. पुरता आवश्यक टीडीआर बिल्डर ने विकत घेतला आहे आणि त्या अनुसार हे approval पुढील काही दिवसात अपेक्षित आहे.

ह्या नंतर आपले विकासक पार्टनर श्री संदीप माहेश्वरी यांनी प्रकल्पात जी पार्किंग ची व्यवस्था करण्यात आली आहे त्याचे सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की पार्किंग साठी चार थर आहेत. पी 1 आणि पी 2 हे थर जमिनीच्या खाली आहेत तर पी 3 आणि पी 4 जमिनी च्या वरती. आपल्या agreement प्रमाणे प्रत्येक सभासदा ला दोन चार चाकी आणि दोन दुचाकी वाहनांसाठी covered पार्किंग मिळणार आहे. श्री माहेश्वरी यांनी असे प्रपोज केले की आपल्या कडील वेगवेगळ्या प्रकार ची घरं बघता आपण पार्किंग चार भागात करू शकतो.

1.12 duplex युनिट धारकांना त्यांच्या युनिट्स च्या खाली पी 4 मधे 24 चार pचाकींची पार्किंग.

2.11 सभासद ज्यांच्या सदनिका टॉवर दोन मधे आहेत त्यांना टॉवर दोन च्या जवळच्या अश्या पी 4 मधील 22 चार चाकी पार्किंग.

3.ज्यांनी युनिट ला युनिट अशी जागा घेतली आहे अश्या 36 सभासदांना पी 4 मधे 72 चार चाकी पार्किंग.

इथे त्यांनी हे स्पष्ट केले की हे सगळी पार्किंग व्यवस्था टेंड्रम पद्धती ची असेल. ह्यात एका कार च्या मागे दुसरी कार असेल आणि मागील गाडी काढताना प्रथम पुढील गाडी बाजूला करून मग मागील गाडी काढता येईन आणि गाडी काढून झाली की  बाजूला घेतलेली गाडी परत जागे वर लावावी लागेल.

4.ज्या सभासदांनी स्प्लिट युनिट्स घेतली आहेत अश्या 43 सभासदांना 86 बाजू बाजू ला कार पार्किंग ची व्यवस्था पी 1 मधे असेल. ह्याने जर सभासदाने स्प्लिट युनिट चा एक भाग भाड्याने दिला किंवा विकला तर ते सभासदांच्या सोई चे असेल.

श्री माहेश्वरी ने ही ही स्पष्ट केले की हे त्यांचे प्रपोजल आहे. सोसायटी ने जर काही वेगळे धोरण आखले तर तसे करता येईल.

त्यांनी हे ही सांगितले की पार्किंग मधे जवळ पास 650 + चार चाकी गाड्यांची आणि दु चाकींची सोय असेल. Visitors parking ची पण वेगळी सोय आहे. कमर्शियल जागांसाठी स्वतंत्र सोय आहे ज्याचा रहिवाश्यांच्या पार्किंग शी संबंध असणार नाही

श्री अनंत शाळीग्राम यांच्या प्रश्नाला की पार्किंग पी 1 आणि पी 2 हे जमिनी खाली आहेत त्यात मागील टेकडीवरून येणारे पाणी लीक होऊन साठू शकण्याचा धोका असेल आणि त्यामुळे मोठे नुकसान होऊ शकते याला उत्तर देता ना श्री माहेश्वरी यांनी स्पष्ट केले की ह्या करिता 30 वर्षांचा पावसाचा डेटा विचारात घेऊन 2 X टाइम्स काळजी घेऊन बांधकाम करण्यात येते त्यामुळे असला धोका होत नाही. पूर्वी अशी काळजी घेतली जात नव्हती.

ह्या नंतर श्री कवडीकर आणि श्री माहेश्वरी यांनी सभासदांच्या शंकांना /प्रश्नांना उत्तरं दिली.

1.काही सभासदांनी विकलांग व्यक्तींना सोई ची होईल अशी व्यवस्था पार्किंग मधे असावी अशी सूचना केली. त्याचा नक्की विचार केला जाईल असे सांगण्यात आले.

2. इलेक्ट्रिक वाहण्याच्या फास्ट चार्जिंग ची जी सोय visitor पार्किंग मधे दाखविण्यात आली आहे ते बरोबर नाही आणि ते फार कमी वाटतात असे काही सभासदांचे म्हणणे होते. ह्याचा विचार करण्याचे माहेश्वरी यांनी सांगितले.

3.कोणा सभासदाला

जास्तीचे पार्किंग घ्यायचे असेल तर जवळपास 20 जास्तीच्या पार्किंग ची सोय उपलब्ध आहे.

4.एका सभासदाने कोर्टात चालू असलेल्या केस बद्दल विचारणा केली त्यावर संस्थे च्या विधी सल्लागार अ‍ॅड. काबरा यांनी स्पष्ट केले की मेळावा कोर्ट केस करता नाही आणि त्यावर इथे चर्चा करणे ठीक होणार नाही.

मेळाव्यात श्री निखिल गीत, श्री यशवंत केंजळे, श्री दिलीप पटवर्धन, श्री अभिजित वारघडे, श्री मलय दातार, श्री अजय डोंगरे, श्री वसंत जोगदेव, श्री राजेश शाह, श्रीमती निर्मला सावदेकर, श्रीमती यशोदा वाकणकर आदी सभासदांनी त्यांचे प्रश्न / सूचना मांडल्या ज्यावर विचार करण्याचे श्री माहेश्वरी यांनी मान्य केले.

सचिव श्री पटवर्धन यांनी मेळाव्याचे समापन करतांना सांगितले की लवकरच सभासदांच्या सूचनांचा विचार करून फायनल पार्किंग प्लॅन

सभासदांना दाखविण्यात येईल आणि त्या अनुषंगा ने लॉटरी पद्धतीने पार्किंग लॉट चे वाटप होईल.

सर्वांच्या उपस्थिती बद्दल धन्यवाद देऊन त्यांनी मेळावा संपल्याचे जाहीर केले.

पंच समिती च्या वती ने